प्रेस नोट

दिनांक ०७/०३/२०१९

**रायगड, पेण येथील खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभागामधील उप अभियंत्यास लाच स्विकारल्याप्रकरणी शिक्षा**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रायगड |
| गुन्हा नोंद क्रमांक | पेण पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र. २४/२०१५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे (मुख्यालय सीआर/१०७०/रायगड/२०१५) |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **अशोक शिवराम भारती, उप अभियंता, अतिरिक्त पदभार कार्यकारी अभिंयता, खारभुमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण, जिल्हा रायगड, वर्ग–२** |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ५,००,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | **१,००,०००/– रुपये** |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्या प्रलंबित बिलांच्या रकमेचा चेक काढण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांना तक्रारदार यांच्याकडुन १,००,०००/– रुपयांची लाच स्विकारताना रंगेहाथ पकडुन, त्यांच्याविरुध्द पेण पोलीस स्टेशन, रायगड येथे दिनांक ०६/११/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>गुन्हयाचा तपास पुर्ण करुन मा. विशेष न्यायालय, अलिबाग, येथे नमुद आरोपी यांचेविरुध्द दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते.<br>सदर गुन्हयाची सुनावणी मा. तदर्थ अति.सत्र न्यायाधीश–१ रायगड, अलिबाग येथे झाली असता सुनावणीअंती नमुद आरोपीविरुध्द सबळ पुराव्यानिशी आरोप सिद्‌ध झाल्याने दिनांक ०७/०३/२०१९ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.<br>**शिक्षा — भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे**<br>१) कलम ७ प्रमाणे १ वर्ष सक्त मजुरी कारावास व २००० रुपये दंड व दंड न भरल्यास २ महिने सक्त मजुरी कारावास.<br>२) कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे १ वर्ष ६ महिने सक्त मजुरी कारावास व ३००० रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने सक्त मजुरी कारावास.(दोन्ही शिक्षा एकत्रीत)<br>सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री.व्ही.एल. आर्डेकर, ला.प्र.वि, रायगड यांनी केला असुन, सरकारी अभियोक्ता म्हणुन श्रीमती निला तुळपुळे व श्री. वाय. एस. भोपी यांनी काम पाहिले. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदद्ल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं :– १०६४

दुरध्वनी क्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९

व्हॉटस्‌ ॲप क्र. :– ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

( डॉ. महेश पाटील )
पोलीस अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे परिक्षेत्र, ठाणे


Scanned by CamScanner